## दिनांक १२.०३.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक १२.०३.२०२५ रोजी स.११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त, महानगरपालिका,अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त(१), महानगरपालिका,अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त(२), महानगरपालिका,अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.१,महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.२,महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.३,महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.४,महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.५,महानगरपालिका, अमरावती
मा.स.स.न.र., महानगरपालिका, अमरावती
मा.शहर अभियंता, महानगरपालिका, अमरावती
मा.कार्यकारी अभियंता, (सा.बां.वि.), अमरावती
मा.कार्यकारी अभियंता, (म.रा.वि.वि.), अमरावती
श्री.मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती
श्री.अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ अमरावती
मा.सिस्टीम मॅनेजर, महानगरपालिका,अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका,अमरावती

## दि.१२/०३/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

## झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री. राम प्रितम पासरे, छत्रसाल नगर, अमरावती. | कडूनिम | ०१ | दि.१९/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर कडुनिमाचे झाड शेजा-याचे अंगणात आहे. त्यांचे कडून परवानगी पत्र प्राप्त झाले असल्यास अर्जदार यांच्या घरावर आलेल्या कडूनिमाच्या झाडांच्या **फांद्या कापण्यास परवानगी देण्याची शिफारस वृक्ष प्राधिकरणास करण्यात येत आहे.** सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या शेजाऱ्याचे सहकार्य घेऊन काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २. | श्री. प्रमोद रामेश्वर सारस्वत, आशियाड चौक, शेगांव रोड, अमरावती | कडुनिम-१, जांभूळ-१ | ०२ | दि.१९/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुनिम-१ व जांभुळ-१ असे दोन्ही झाडे अर्जदाराचे घराबाहेर आहे. झाडे हिरवेगार आहे. अस्ताव्यस्त झालेल्या **फांद्या काढण्याला परवानगी देण्यास** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **हरकत नाही.** परंतू झाडाचा तोल बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसे अर्जदारास कळविण्यात यावे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ३. | श्री. रोशन अशोकराव तंतरपाळे, कल्पना नगर, नवसारी पावर हाऊस मागे, अमरावती | बदाम | ०१ | दि.१९/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता बदाम चे एक हिरवेगार झाड आहे. ते अर्जदाराचे घराचे समोर घराबाहेर आहे. झाड हिरवेगार असल्यामुळे **तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व फक्त इलेक्ट्रीक तारात गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात** यावी. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४. | प्रशिक बहुउद्देशीय संस्था, अमरावती. | विविध प्रजाती | १२ | दि.१९/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता विविध प्रकारच्या १२ झाडांच्या **फांद्या ज्या इलेक्ट्रीक तारात गेलेल्या त्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही.** परंतू झाडांचा तोल बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. तसे संबंधितांना कळवावे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५. | श्रीमती संगिता विवेक पाटील, हॉलीवूड कॉलनी जवळ, सत्यदेव पार्क, अम. | पिंपळ | ०१ | दि.०७/०३/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता **पिंपळाच्या झाडाच्या फांद्या Electric तारात गेलेल्या M.S.E.B च्या** माध्यमातून मनपा उद्यान विभागाद्वारे काढण्यात याव्यात व झाडाचा Balance जाणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६. | श्री. श्याम साधुराम छुटलानी, गणेडीवाल लेआऊट, कॅम्प, अमरावती | कडुबदाम-१, बाभुळ-२ | ०३ | दि.१९/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता **कडुबदाम-२ व बाभुळ-१ अर्धवट स्वरूपात सुकलेले आहे.** त्यामुळे तिनही सुकलेली झाडे काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही अशी शिफारस वृक्ष प्राधिकरणास करण्यात येत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेली असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.त्याबदली वृक्ष लावण्याचे सूचित करावे.** |
| ७. | १) श्री. जानरावजी राऊत, २) श्री. संजय प्रल्हादराव भडांगे, ३) श्री.प्रल्हाद भुगूल, प्रविण नगर, अमरावती | कडूनिंब | ०१ | दि.२५/०२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सविनय फेर सादर करण्यात येते की, कडुनिंब वृक्ष अर्जदाराच्या आवारात असून **पुर्णपणे किडलेला व वाळलेला असुन त्यांच्या फांद्या इलेकट्रीक तारात गेलेल्या वादळी वा-यामुळे वृक्ष पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याअनुषंगाने सदर वाळलेला वृक्ष उद्यान विभागामार्फत काढून घ्यावा लागेल.** सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष वाळलेली असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेली असल्याने उद्यान विभाग मार्फत वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८. | उपविभागीय अधिकारी, सा.बां. उपविभाग क्र.१, अमरावती विभागीय क्रिडा संकुल, अमरावती | विविध प्रजातीचे | १७ | दि.०७/०३/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सा.बां.विभाग अमरावती **यांनी क्रिडा संकुल येथील १७ झाडे काढण्याकरीता परवानगी मागितलेली आहे. विविध प्रजातीची १७ झाडे काढण्यास नियमानुसार १७ X ६०००/- = रू.१,०२,०००/- मनपा खाती अनामत रक्कम जमा करून परवानगी** देण्यास हरकत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | **तांत्रिक सदस्या सोबत पुन्हा पाहणी करून अहवाल फेर सदर करावे.** | **तूर्त वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ९. | श्री. जलालोद्दीन | पिंपळ | ०१ | दि.०७/०३/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे | | **सदर प्रकरणी** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नजमोद्दीन सैय्यद, पॅराडाईज कॉलनी, अमरावती | | | समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पिंपळाचे एक झाड अर्जदाराचे मुख्य प्रवेश द्वारासमोर आहे. बांधकामास परवानगी प्राप्त आहे. **नियमानुसार रू. ६०००/- मनपा खाती अनामत रक्कम जमा करून झाड काढण्याची परवानगी देण्याची शिफारस** करण्यात येत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा. | **अहवाल प्राप्त पुन्हा पाहणी नंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १०. | श्री. रविंद्र नामदेवराव माळवे, मेहरदेव कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती | कडुबदाम | ०१ | दि.०७/०३/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुबदामचे एक झाड अर्जदाराचे मुख्य प्रवेश द्वारासमोर आहे. बांधकामास परवानगी प्राप्त आहे. **नियमानुसार रू. ६०००/- मनपा खाती अनामत रक्कम जमा करून झाड काढण्याची परवानगी देण्याची शिफारस** करण्यात येत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | पुन्हा स्थळ निरीक्षण करून अहवाल सादर करावा. | **सदर प्रकरणी अहवाल प्राप्त पुन्हा पाहणी नंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ११. | श्री. शिरीष शामराव निकम, आदीत्य बंगला डॉ.सुधा देशमुख दवाखान्याजवळ, अमरावती | सागवान | ०१ | दि.०७/०३/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एक सागवान झाड जे परिपक्व झालेले आहे. नियमानुसार **रू. २०००/- वृक्ष प्राधिकरण खाती अनामत रक्कम जमा करून झाड काढण्याची परवानगी देण्याची शिफारस** करण्यात येत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे सागवान धोरणानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२. | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, ड्रीमलॅंड बिझनेस पार्क, बोरगांव धर्माळे, अमरावती | विविध प्रजातीचे | ११९ | दि.२४/०२/२०२५ रोजी तिस-यांदा स्थळ पाहणी करून वृक्षाला दिलेले क्रमांक तसेच काढावयाचे वृक्ष व राखवायचे वृक्ष याबाबत वेगवेगळे चिन्हांन करण्यात आल्याचे (सुचनेनुसार) दिसुन आले. अर्जदाराने (राष्ट्रीय महामार्ग क्र.६) रहाटगांव बायपासला जोडणारा हायवेवर उड्डानपुल/साईड वे व नालीचे बांधकाम प्रस्तावित केले असुन काम सुरू झाले आहे. बांधकामात येणारी एकुण ११९ विविध प्रजातीची वृक्ष काढावयाची अर्जात म्हटले होते. तथापि सुक्ष्म नियोजन करण्यासाठी सुचविण्यात आले. त्यात विविध प्रजातीची (लिस्ट संलग्न) २१ वृक्ष वाचविण्यात येतील असे दिसुन आले. सबब काढावयाचे ११९ वृक्षांपैकी २ सागवान, ७ गुलमोहर, २ सिसम, १ महारूख, २ कडुनिंब, ७ चिरॉल असे एकुण २१ वृक्ष (ज्याचे वृक्ष क्रमांक जोडलेले आहे) राखावयाची आहेत. उर्वरीत ९८ सोबत जोडलेल्या लिस्ट नुसार काढावयाची परवानगी देण्यास हरकत नाही. अर्जदाराने उर्वरीत ९८ वृक्ष तोडण्याबाबत १४ सागवान वृक्षापैकी ०२ सागवान वृक्ष वगळता १२ सागवान वृक्ष व इतर प्रजातीची ८६ वृक्ष असे एकुण ९८ वृक्षांची परवानगी मागितली आहे. नियमानुसार १२ सागवान X २०००/- = २४,०००/- व ८६ वृक्ष X ६०००/- = ५,१६,०००/- असे एकुण ५,१६,००० + २४,००० = ५,४०,०००/- रू. **इतकी अनामत रक्कम वृक्ष प्राधिकरण खाती जमा करून झाड काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.** सबब | वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून ९८ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्णयार्थ सादर. | | |
| १३. | श्री.राजेश महादेवराव गुलहाने रा.शेगाव रोड अमरावती | सागवान | १ | दि.१०/०३/२०२५ रोजी मा.सहा.आयुक्त पाहणी केली असता अर्जदाराच्या प्लॉट मध्ये एक सागवान वृक्ष परिपक्व झाले असून सदर प्रकरण वृक्ष प्राधिकरण यांच्या सभे मध्ये मांडावे लागेल त्यानंतर सभेच्या निर्णया नुसार नियमा प्रमाणे १ वृक्ष x २०००/- =२०००/- रु.इतकी अमानत रक्कम वृक्ष प्राधिकरण खाती जमा करून झाड काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.सबब निर्ण्ययास्थव सादर | **वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:१ प्रमाणे सागवान धोरणानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १४. | श्री. गणेश दादाराव अनासाने, दहिसाथ चौक, भाजीबाजार, अमरावती विजय कॉलनी मधील मनपा बगीचा ऑनलाईन तक्रार | विविध प्रजाती | १४ | मागील सभा दि.२१/०१/२०२५ रोजीचे ठराव क्र.१० अन्वये अर्जदारास जा.क्र.अमनपा/स.आ./उ.प्र/१०२७/२०२५, दि.०७/०२/२०२५ अन्वये मा.कार्यकारी अभियंता, अमरावती व जा.क्र.अमनपा/स.आ./उ.प्र/१०२८/२०२५, दि.०७/०२/२०२५ अन्वये उपअभियंता (बांधकाम), उत्तर झोन क्र.१, मनपा, अम. यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला असुन अद्यापपावेतो अहवाल अप्राप्त असुन पुनःश्च स्मरणपत्र-१ देवून कळविण्यात आले आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **खुलासा मागविण्यात यावा.** | **खुलासा मागविण्यात यावा व प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.** |

## झोन क्र. २

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री. शेखर भिमरावजी भडके श्याम नगर गल्ली नं. ३ अमरावती** | **अशोका वृक्ष वाळलेले** | १ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे घराचे बांधकाम सुरु आहे. अर्जदारास ससनर विभागाची बांधकाम परवानगी प्राप्त असल्याचे सांगण्यात आले. वाळलेला अशोका वृक्ष बांधकामात येत असल्याने नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बदली वृक्ष स्थानिक प्रजातिची लावण्याचे सुचित करण्यात यावे. नियमानुसार १ अशोका वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तरमंजुरीस सादर.जा.क्र. ९३५ दि.१०/०२/२०२५ | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| २ | **श्री शिरभाते उपअभियंता अमरावती उपविभाग म्हाडा अमरावती गृहनिर्माण भवन टोपे नगर अमरावती** | **काशिद - १५ महारुग – ४ इंग्रजी चिंच -१ अशोका – ५** | २८ | दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. दि. १२/०२/२०२५ च्या सुचनानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन आले. अर्जदाराचे परीसरात एकुण ४८ पेक्षा अधिक वृक्ष असल्याचे दिसुन आले. त्यापैकी काशिद १५ महारुख ४ इंग्रजी चिंच १ अशोका ५ उंबर १ गुलमोहर २ अश्या एकुण २८ वृक्षाच्या ईमारतीकडे झुकलेलया व अस्त व्यस्त | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उंबर – १<br>गुलमोहर - २<br>फांदया | | वाढलेल्या २ ते ६ इंच व्यासाच्या तसेच गुलमोहर १ महारुग १वृक्षाच्या ६० सेमी पर्यत व्यासाच्या फांदया काढण्यास हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचातोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्या. वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्र. ९८७ दि.०६/०३/२०२५ | | |
| ३ | श्री विनया कांत<br>सचिव<br>शारदा उद्योग मंदिर<br>अमरावती | एक पिंपळ वृक्षफांदया | १ | दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या फांदया अर्जदाराचे ईमारतीवर झुकलेल्या असल्याचे दिसुन येते. मनपा उद्यान विभागामार्फत २-४ इंच व्यासाच्या फांदया ईमारतीकडील काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्षाचा तोल बिघडणार नाही. याची दक्षता घ्यावी. वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी उद्यान विभाग यांचे कडे कार्यवाही करीता पाठविण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.जा.क्र. ९९४ दि ०६/०३/२०२५ | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. |
| ४ | श्री संजस म. बन्नोरे<br>एल. आय. सी कॉलनी<br>अमरावती | आंबा वृक्ष फांदया | १ | दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वताचे राहते घराचे परीसरात आंबा वृक्ष छान वाढलेला व हिरवागार व फळांनी बहरलेला आहे. आंबा वृक्षाच्या बारीक फांदया शेजा-याचे ईमारतीकडे झुकलेल्या असल्याचे दिसुन आले. सबब शेजा-याच्या ईमारतीवर झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी अर्जदारास देण्यास हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचातोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्या. वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्र. ९९२ दि.०६/०३/२०२५ | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. |
| ५ | श्रीमती अनुताई केवाडे<br>बापटवाडी<br>अमरावती | कडुनिंब व उंबर<br>फांदया | १<br>१ | दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वताःचे घराचे परीसरात कडुनिंब वउंबर वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराचे घरावर झुकलेल्या कडुनिंब वृक्षाच्या २ ते ६ इंच व्यासाच्या तसेच उंबर वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांदया विद्युततारेकडे झुकलेल्या फांदया काढण्याची परवानगी देण्यातस हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचातोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्या. वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्र. ९९३ दि.०६/०३/२०२५ | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. |
| ६ | शेख रशिद शेख तस्लीम<br>नमुना गल्ली नं. ३<br>अमरावती | महारुग वृक्ष फांदया | १ | दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे शेजारी असलेल्या मोकळया प्लॉटमध्ये वाढलेला महारुख वृक्षाच्या फांदया | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या आहेत. शेजाराच्या परवानगीने २-४ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचातोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्या. वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.<br>जा.क्र. ९८६ दि.०६/०३/२०२५ | | **कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| ७ | **मा. अध्य क्ष आर.बी . अटल हिंदु स्मशान संस्था अमरावती** | **पिंपळ वृक्ष कडु बदाम** | १<br>१ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. हिंदु स्मशान संस्थेच्या अस्तीविर्सजन स्थळाला कंपाऊड भिंत बांधकाम सुरु असल्याचे दिसुन आले. प्रत्यक्ष येणारा पिंपळवृक्ष जुन्या भिंतीत वाढलेला असल्याने तो कोलमडु शकतो. सबब पिंपळवृक्ष काढण्याची नियमानुसार ठेव स्वीकारुन बदली वृक्ष लावण्याचे अटीवर परवानगी देण्यास हरकत नाही. दुसरा कडुबदाम करज वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्ष वाचविला जाऊ शकतो याबाबत संबंधिताशी चर्चा केली त्यास त्यांनी संमती दिली सबब करज वृक्ष राखण्यात यावा. एक पिंपळवृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | **कडुबदाम वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. दुसरा कडुबदाम वृक्ष राखण्यात यावा.** |
| ८ | **श्री. पांडुरंग विठ्ठलराव स्वर्गे बेलपुरा रेल्वे लाईन शाळेमागे अमरावती** | **उंबर** | १ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. उंबर वृक्ष भारतीय रेल्वेच्या मालकीच्या जागेत असल्याचे दिसुनआले. वृक्ष काढण्याची अर्जदारास परवानगी देणे करीता रेल्वेची संमती घ्यावी लागेल. सबब अर्जदारास तसे प्रत्यक्ष भेटित सांगण्यात आले. त्यास त्यांनी होकार दिला. सबब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास सादर. | **सदर जागाभारतीय रेल्वेच्या मालकीची आहे.** | **सदर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ९ | **श्री. प्र.ग. सराफ कोल्हटकर कॉलनी अमरावती** | **आडजात वृक्ष** | १ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. वृक्षसार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. कोणतीही अडचण दिसुन आली नाही. अर्जदाराशी चर्चा केली त्यांचे समाधान झाले. सबब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोहचवु नये असे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर. | **वृक्षाला इजा पोहचवु नये असे आदेशित करण्यात यावे.** | **सदर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १० | **सुनंदा रामदास वानखडे गरीब नगर भुतेश्वर चौक अमरावती** | **कडुनिंब वृक्ष** | १ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अहवालाच्या अनुषंगाने अर्जदाराला घरकुल मिळणाऱ्याची लिस्ट सोबत जोडली असुन त्या लिस्ट मध्ये सदर अर्जदार सुनंदा रामदास वानखडे यांचे नाव असल्याचे दिसुन येते घरकुलाचे बांधकामात वृक्ष येत असल्यास नियमाप्रमाणे कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | **बांधकामात वृक्ष येत असल्याने परवनागी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ११ | **श्री. मिलींद रघुनाथ जोशी जोशी कॉलनी** | **सागवान -१ कडुनिंब – ३** | १२ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.अर्जदार यांचे घराचे परीसरात विविध | **खुलासा फेटाळण्यात आला आहे.** | **सदर प्रकरणी दंड आकारण्याची कार्यवाही प्रसवित** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **शेकेश्वर -१**<br>**चिंच – २**<br>**गुलमोहर – १**<br>**उंबर – २**<br>**शेवगा - २** | | प्रकारची मोठ मोठी २० ते ३० वृक्ष असल्याचे दिसुन आले. अर्जदारास त्यांचे परीसरात एकुण किती वृक्ष आहेत त्याची यादी खालीलप्रमाणे वृक्ष यादी मागवावी लागेल.<br>१)अ.क. / २)वृक्ष क्रमांक / ३)वृक्षाचे नाव<br>४)वृक्षाचीउंची (मी.) / ५)वृक्षाचीजाडी सेमी / ६)वृक्षाचे वय<br>त्यानंतर वृक्ष तोडण्याची फांदया तोडण्याची परवानगी देता येवु शकेल. सबब तुर्त परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदारास वृक्षाला इजा पोहचवु नये असे आदेशित करण्यात यावे. वृक्षाची यादी सादर करणे बाबत पत्र देण्यात आले आहे. जा.क्र.९३६ दि. १०/०२/२०२५ अर्जदार श्री जोशी यांनी सदर घर व जागा विकलीअसुन श्री पंनपालीया यांनी खरेदी सौदा केल्याचे समजले आहे. सदर खरेदी दाराने कडुनिंब वृक्ष एक दोन सुबाभुळ विनापरवानगी तोडल्याचे निष्पन्ना झाले आहे. सबब सदर घर विकत घेतल्याचा सौदा करणा-या श्री पंनपालिया यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. सदर गैरअर्जदाराचा खुलासा प्राप्त झाला असुन खुलासा फेटाळण्यात यावा. व तीन वृक्ष तोडल्याबाबत २००००X३ =६००००/- साठ हजार रुपये दंड भरण्याचे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर. | | **करण्यात यावी.** |
| १२ | **डॉ. गणेश मा. काळे खापर्डे बगीचा अमरावती** | **बुच वृक्ष** | १ | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. बुच वृक्ष अर्जदाराचे हॉस्पीटलचे नव्या ईमारतीत कोप-यावर छान वाढलेला आहे. परंतु खोड पोखरलेले असुन वृक्ष वयस्कर झालेला आहे. वादळात पडण्याची शक्यता लक्ष्यात घेता नियमानुसार बदली तिन वृक्ष लावण्याचे ठेव ठेवण्याच्या अटिवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. नव्या सदर ईमारतीच्या परीसरात अर्जदाराने विविध प्रजातीची वृक्ष लावलेली व वाढलेली असल्याचे दिसुन येते. सबब वृक्ष काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | **खोड पोखरलेले असुन वृक्ष वयस्कर झालेला असल्याने परवनागी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १३ | **मा. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती** | **बदाम**<br>**सुईबाभुळ**<br>**अशोका** | ३<br>२<br>१ | दिनांक ०३/०२/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.फेर पाहणी केली अर्जदाराचे परीसरात विविध प्रजातीची २० वृक्ष आहेत. ( यादी जोडल्याप्रमाणे त्यापैकी ३ बदाम वृक्ष २ सुबाभुळ वृक्ष १ अशोका वृक्ष अशी एकुण ६ वृक्ष प्रत्यक्ष बांधकामात येत असल्याचे दिसुन आले. ( नकाशाप्रमाणे ) सबब बांधकामात येणारी ६ वृक्ष नियमानुसार ६x३ = १८x२०००=३६०००/- छत्तीस हजार रुपये ठेव स्वीकारुन वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. दि. ०१/०१/२०२५ रोजीचे अहवालानुसार खुलासा अप्राप्त आहे. अवैध वृक्षतोडी बाबतचा खुलासा मिळाल्यानंतर परवानगी | **जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांचे महत्वाचे बांधकाम असल्याने वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून ६ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | देण्यास हरकत नाही.दि. ०७/०३/२०२५ रोजी लेखी खुलासा प्राप्त झाला आहे. उचित निर्णयास सादर. | | |

## झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.अविनाश अ.अकोटकर रा.वनश्री कॉलोनी अम. | अशोका | १ | दि.०५/०२/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. अशोका वृक्ष सार्वजनिक जागेवर हिरवागार व छान वाढलेला आहे.वृक्षाच्या फांद्या पूर्वीच छाटलेल्या आहेत.सबब फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी.<br>अर्जदाराच्या घरी नियमानुसार वृक्ष लागवड केली नाही आहे.करिता अर्जदारास स्वताच्या घरातील परिसरात दोन वृक्ष लागवड करून ३० दिवसात अहवाल पाठविण्याचे आदेशित करावे.तसे न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे सूचित करण्यात यावे.उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष सार्वजनिक जागेवर हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| २ | श्री.राजू हिवरकर रा.सरोज कॉलोनी अम. | कडूनिंब | १ | दि.०५/०२/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. कडूनिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराच्या घरावर झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या म.न.पा.ने शक्तिमान यंत्राद्वारे काढण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| 3 | श्री.देवीसिंग ह. डाबेराव उपसचिव राज्य माहिती आयोग खंडपीठ ,अमरावती. | सुबाभूळ | २ | दि.०५/०२/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.राज्य माहिती आयोग कार्यालय परिसरात लागून असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाचे जागेत २ सुबाभूळ वृक्ष आहेत.वृक्षाच्या फांद्या माहिती आयोग कार्यालय परिसरात झुकलेल्या आहेत.सबब वृक्ष काढण्याची परवानगी देता येणार नाही.माहिती आयोग कार्यालय परिसरात झुकलेल्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सा.बा.विभागाच्या सहकार्याने व संमतीने फांद्या काढण्यात याव्यात. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| 4 | श्री.प्रकाश खेडकर रा.किरण नगर न. १ अम. | वनएरंड | १ | दि.०५/०२/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. वनएरंड वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला अर्जदाराच्या घराच्या बाजूला छान वाढलेला व हिरवागार आहे.तथापी वृक्षाचे खोड किडले असल्याने तसेच वृक्षाची प्रजाती फार काळ टिकणारी नाही आहे.सबब म.न.पा. उद्यान विभागाने वृक्ष | **वनएरंड वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला असून तथापी वृक्षाचे** | **उद्यान विभागाने वृक्ष काढण्याची कार्यवाही करावी व त्याच जागेवर २ वृक्ष** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | काढण्याची कार्यवाही करावी व त्याच जागेवर २ वृक्ष लावावे.वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **खोड किडले असल्यानेवृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **लावावे.वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री.नितीन कळसकर रा.फोरेस्ट कॉलोनी अम. | सागवान | ७ | दि.०५/०२/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराच्या घरातील परिसरात असलेल्या खाली प्लॉट मध्ये शेवगा,आंबा,कडूनिंब,निंबू,फणस व सागवान वृक्ष असे एकूण १२ वृक्ष आहेत.त्यापैकी परिपक्क झालेली ०७ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी साग धोरणानुसार देण्यास हरकत नाही. इतर कोणत्याही वृक्षाला इजा पोहचवू नये असे सूचित करण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे सागवान धोरणानुसार ७ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री.श्रीकांत प्र.कलोती रा.सुभाष कॉलोनी अम. | जांभूळ | १ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. जांभूळ वृक्ष अर्जदाराच्या बंद घरात छान वाढलेला हिरवागार आहे.कोणतीही अडचण दिसून आली नाही.माहिती देण्याकरिता कोणीही उपलब्ध नव्हते.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ७ | श्री.गजानन रा.ठोसर रा.जयंत कॉलोनी अम. | | २ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. बकाण वृक्ष म.न.पा च्या वाचनालय परिसरात छान वाढलेला हिरवागार आहे.शेजारी राहणारे श्री ठोसर यांनी त्यांचे घरावर विद्युत निर्मिती युनिट बसविले आहे.त्यावर सावली पडत असल्याचे अर्जदार यांचे म्हणणे आहे.सबब १ ते २ इंच व्यासाच्या इमारती कडे झुकलेल्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | प्रकाश गुंजाळकर रा.यशोदा नगर अम. | अशोक | १ | अर्जदाराशी संपर्क होऊ शकला नाही.पाहणी करून पुढील सभेत ठेवण्यात येईल. | **पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ९ | श्री गजानन सुरजुसे रा.वडाळी | पिंपळ | १ | अर्जदाराशी संपर्क होऊ शकला नाही.पाहणी करून पुढील सभेत ठेवण्यात येईल. | **पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १० | सचिव शंकरनगर सहकारी गृहनिर्माण संस्था,रा.शंकर नगर | | ४ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. शंकर नगर गृहनिर्माण संस्थेने सार्वजनिक उपयोगा सोडलेल्या जागेत विहिरीजवळ मोटारपंप करिता सोलर प्लांट टाकण्याचे कारणास्तव वृक्ष तोडण्याची परवानगी मागितली आहे.परंतु अद्याप सोलर लावलेला नाही तसेच जागा निश्चित नाही असे सांगण्यात आले. सबब प्लांट लागल्यावर वृक्ष काढण्याबाबत विचार करता येईल. तूर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **पत्र देण्यात यावे व खुलासा मागविण्यात यावा** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ११ | अनिल मा. माहोरे रा.फ्रेजरपुरा | बाभूळ | १ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.बाभूळ वृक्ष रस्त्याच्या कडेला छान वाढलेला हिरवागार आहे.अर्दाराच्या घरावर झुकलेल्या २ते ३ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या घरावर झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सादर. | | **परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२ | मा.कुलसचिव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अम. | सुबाभूळ<br>बाभूळ<br>करंज<br>कडूनिंब<br>हिवर<br>काशिया<br>सागवान<br>आवळा<br>कांचन<br>निलगिरी<br>गोदान | ४४<br>२४<br>०७<br>०६<br>०५<br>०३<br>०३<br>०३<br>०२<br>०१<br>०१ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.विद्यापीठ परिसरातील विविध प्रजातीची ९९ वृक्ष वाळलेली आहे.त्यांना नियमाप्रमाणे एक वृक्ष तोडण्याच्या बदल्यात एक वृक्ष लावणे व त्याचा अहवाल सादर करण्यास सांगून परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वाळलेली वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर ९९ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १३ | श्री.अरुण जाधव रा. वडाळी | पिंपळ | १ | दि.१०/०३/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला हिरवागार आहे.कोणतेही अडचण दिसून आली नाही.सबब वृक्ष तोडण्याची/फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष सार्वजनिक जागेवर हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या फांद्या/वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १४ | श्री.वासुदेव माकोडे रा.भारतीय कॉलोनी | कडूनिंब | १ | वृक्ष प्राधिकरण सभा दि.२१/०१/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र.१४ नुसार सहा.अभियंता यांच्या सह पाहणी करण्यात आली.सदर वृक्ष मंजूर बांधकामात येत नसल्याने वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष मंजूर बांधकामात येत नसल्याने वृक्ष तोडने नाकारण्यात यावे.** | **वृक्षाच्या फांद्या/वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १५ | श्री. उत्तमराव इंगोले रा.केवल कॉलोनी अम. | कडूनिंब | १ | तक्रारदार श्री. उत्तमराव इंगोले रा.केवल कॉलोनी यांनी गैरअर्जदार श्री.शेख हनीफ शेख महेबूब रा. वडाळी यांनी विनापरवानगी वृक्ष तोड केल्या बाबत तक्रार केली.त्या अनुषंगाने तपासणी केली असता गैरअर्जदार शेख हनीफ शेख महेबूब यांना वृक्षप्राधिकरण सभा दि.२७/०९/२४ रोजीच्या सभेतील ठराव क्र.३ नुसार उद्यान विभाग मार्फत फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात आली होती.परंतु तपासणी दरम्यान वृक्ष पूर्ण तोडल्याचे दिसून आले.या बाबत त्यांना दि. २८/०१/२५ रोजी नोटीस देण्यात आली आहे परंतु अद्याप पर्यंत खुलासा अप्राप्त आहे. उचित निर्णयास्तव सादर. | **खुलासा मागवावा** | **सदर बाबत पुन्हा पत्र देवून खुलासा मागवावा खुलासा प्राप्त न झाल्यास पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.** |
| १६ | श्री. तौकीर पठाण रा.अंध विद्यालय वडाळी | महारुख | १ | श्री. तौकीर पठाण रा.अंध विद्यालय वडाळी यांनी गैरअर्जदार मझहरखान पठाण रा. अंध विद्यालय वडाळी यांनी विनापरवानगी वृक्ष तोड केल्याबाबत online तक्रार केली होती.त्या अनुषंगाने वृक्षाची पाहणी केली असता,वृक्षाच्या परिसरात तार फेन्सिंग केले आहे.मायरुख वृक्ष अंदाजे एक वर्ष वयाचे असेल.ते वृक्ष अर्धेवट तोडले आहे.त्याबाबत गैरअर्जदार मझहरखान पठाण यांना नोटीस देण्यात आली होती. त्या नोटीसचा खुलासा गैरअर्जदार यांनी सादर केला आहे.त्यामध्ये त्यांनी मी कोणतेही झाड तोडले नसून या प्रकरणाची मला काही कल्पना नाही. तो प्लॉट कोणाचा आहे याची मला कल्पना नाही.मला या प्रकरणात गोवल्या जाऊ नये असा खुलासा सादर केला आहे.उचित निर्णयास्तव सादर. | **सदर प्रकरण पुढील सभेत सादर करावे.** | **वृक्ष अधिकारी यांनी चौकशी करून प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवावे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | गैर अर्जदार श्री.देवकीशोर गडपांडे रा.फोरेस्ट कॉलोनी | कडूनिंब | १ | वृक्ष प्राधिकरण सभा दि.१३/१२/२४ रोजीच्या सभेतील ठराव क्र.१४ नुसार विनापरवानगी १ कडूनिंब वृक्षाच्या फांद्या तोडल्याबद्दल १०,००० रुपये दंड आकारण्यात आला होता.त्यावर त्यांनी दंड माफ करण्याबाबत पत्र दिले आहे. त्यामध्ये त्यांनी माझे वय ७२ वर्ष असून विविध आजाराने ग्रस्त आहे.माझ्या घरी छान हिरवीगार वृक्ष वाढली आहेत.सदर तोडलेल्या वृक्षाचा माझा काही सबंध येत नाही.सदर वृक्षाच्या फांद्या कोणी तोडल्या याची मला काही कल्पना नाही. वृक्षाच्या फांद्या तोडल्या तेव्हा मी सहपरिवार बाहेरगावी गेलो होतो.वृक्षाच्या फांद्या विद्युत विभागाने तोडल्या असव्यात असा अंदाज आहे.सदर वृक्ष हिरवागार असून सुव्यवस्थित आहे.तरी मला केलेला दंड माफ करून मला होत असलेल्या मानसिक त्रासातून मुक्त करण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर. | **खुलासा मान्य करण्यात यावा.** | **दंड माफ करण्यात यावा व पुढे कोणत्याही वृक्षाला इजा पोहचू नये असे आदेशित करण्यात यावे.** |

## झोन क्र. ४

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.रमाकांत पिडीयार साई नगर,अमरावती | चिंच २ कडूनिंब ११ उंबर १ आडजात २ | १६ | दि. ३१.०१ .२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. **तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :- सहा.आयुक्त यांच्या सोबत पुन्हा स्थळ निरीक्षण करून लेआऊट चा सखोल अभ्यास केला त्यावेळी असे निर्देशनास आले कि,लेआऊट चे उत्तर दिशेला असलेल्या पूर्व पश्चिम रस्त्यावरील १३ वृक्षापैकी A.(ज्यात वृक्ष क्र.१० कडूनिंब व वृक्ष क्र.१७ गोंधन) २ वृक्ष काढण्याची नियमानुसार ठेव स्वीकारून परवानगी देण्यास हरकत नाही व इतर कोणत्याही वृक्षाला इजा पोहचू नये( ज्यात ओपन स्पेस मधील ३ कडूनिंब व रस्ता बांधकामात न येणारी ११ वृक्ष राखण्यात यावी.)_B.(वृक्ष यादीत_एका वृक्षाला २ क्रमांक दिलेले असल्याचे दिसून आले.सबब एकूण वृक्ष १६ आहे.) **अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी मंजुरी करिता सादर.** | **अहवालानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार १:३ प्रमाणे ठेव स्विकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर २ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | श्री. प्रविण मोरेश्वर काळबांडे गोपाल नगर,अमरावती | आंबा | १ | दि. ३१.०१.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. **तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :-आंबा वृक्ष शेजारी राहत असलेले श्री गावंडे यांच्या घराच्या आवारात असून छान वाढलेला व हिरवागार आहे व आंबा बहरलेला | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे.अर्जदाराच्या घराकडे झुकलेल्या २ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी शेजारी श्री.आशिष गावंडे यांचे सहकार्य घेवून त्यांना अवगत करून काढण्यास हरकत नाही.फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी तश्या सूचना देण्यात याव्या,वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.<br>**अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याकरीता सादर.** | | |
| ३ | श्री.शशांक रमेश देशमुख स्वस्तिक नगर,अमरावती | कडूनिंब | १ | दि. ३१.०१.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :- कडूनिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या विद्युत विभागाच्या सहकार्याने उद्यान विभागाने काढण्यास हरकत नाही.फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्री.पुंजाराम झोलबाजी ठवरे पाचबंगला बडनेरा | महारुख | १ | दि.१४.०२.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :- महारुख वृक्ष अर्जदाराचे घराशेजारी सार्वजनिक जागेवर आहे वृक्षाच्या फांद्या अर्जदारच्या घराकडे झुकलेले आहे सबब २ते४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागास देण्यास हरकत नाही.वृक्षाचा तोल बिघडणार नाही अश्या पद्धतीने फांद्या काढण्यात याव्यात असे सूचना देण्यात याव्यात<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्री.रवी वानखडे जुनी वस्ती बडनेरा | गुलमोहर | १ | दि. १४.०२.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :- गुलमोहर वृक्ष सार्वजनीक जागेवर पुतळयाच्या शेजारी छान वाढलेला व हिरवागार आहे.पुतळयाकडे झुकलेल्या२ते४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागास देण्यास हरकत नाही,फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात यावी.<br>**अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या पुतळयाकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्राचार्य ,<br>रामराव देशमुख कला व इंदिराजी कापडिया वाणिज्य महाविद्यालय बडनेरा | वावळी | १ | दि. १४.०२.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल** :-वृक्ष अर्जदाराच्या कॉलेज च्या परिसरात आहे वृक्ष हिरवागार व छान वाढलेला कोणतीही अडचण दिसून येत नाही.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी,वृक्षाला इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे.<br>• **अहवालानूसार वृक्ष काढण्याची मंजुरी नाकारण्याकरिता सादर.** | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाची कुठलीही अडचण नसल्याने वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ७ | गैरअर्जदार<br>श्री पवन मुंजाल<br>रेल्वे क्वार्टर क्र.B. RB.II.४.<br>साई नगर,अकोली ,अमरावती | कडूनिंब | १ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-**<br>दि.३०/०१/२०२५ रोजी साईनगर ते अकोली रेल्वेस्टेशन रस्त्यावर असलेले रेल्वे क्वार्टर क्र.C.R.B II ४ च्या आवारामध्ये आतील परिसरात १ कडूनिंब हिरवेगार वृक्ष अवैधरित्या कटाई केल्याच्या तक्रारी नुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण दरम्यान तेथील नागरिकांना विचारपूस केली असता सदर वृक्ष तोड गैरअर्जदार श्री पवन मुंजाल रेल्वे क्वार्टर क्र.B.RB.II.४. यांनी केल्याचे फोटोवरून दिसून येते गैरअर्जदार रेल्वे कर्मचारी असल्याचे माहिती प्राप्त झाली त्यानुसार त्यांना या कार्यालयाचे जा.अमनपा/द.प्र./सआ/९१३/२०२५ दि.१३/०२/२०२५ रोजी अवैध वृक्ष केल्याबाबत खुलास्याची नोटीस रजिस्टर पोस्टाद्वारे दि.१४/०२/२०२५ ला पाठविण्यात आली आहे.परंतु गैरअर्जदार यांनी अद्याप पर्यंत खुलासा सादर केलेला नाही.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर .** | **खुलासा मागविण्यात यावा** | **खुलासा प्राप्त न झाल्यास दंड आकारण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.** |
| ८ | तक्रारकर्ता<br>सौ.चेतना कुलकर्णी<br>स्वामी समर्थ कॉलोनी,निंभोरा खुर्द बडनेरा | बुच | २ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** स्वामी समर्थ कॉलोनी न.२ निंभोरा खुर्द येथील ओपन स्पेस मध्ये असलेले २ बुच वृक्षाना जाळून नष्ट करण्याचा प्रयत्न श्री महावीर जैन यांनी केल्याबाबत ची तक्रार प्राप्त झालेली आहे त्यानुसार गैरअर्जदार श्री महावीर जैन यांना या कार्यालयाचे जा.अमनपा/द.प्र./सआ/९१४ /२०२५ दि.१३/०२/२०२५ रोजी खुलास्याची नोटीस रजिस्टर पोस्टाद्वारे दि.१४/०२/२०२५ ला पाठविण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी या कार्यालयात दि.१७/०२/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे.सदर खुलास्यावर मा.तांत्रिक सदस्य यांचे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षन अहवाल घेण्यात आलेले आहे.<br>**तांत्रिक सदस्य यांचा अहवाल :-**<br>दि.०७/०३/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले सार्वजनिक उद्यानामध्ये असलेल्या २ बुच (आकाश निंब ) वृक्षाना जाळण्याचा व वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न | **प्रत्यक्ष पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात यावे.** | **प्रत्यक्ष पुरावे सादर करण्याबाबत पत्र देऊन खुलासा मागविण्यात यावा.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केल्याचे दिसून आले.आगीच्या प्रभावाने वृक्ष वाळत आहेत.गैरअर्जदार यांनी दिलेल्या खुलास्याचे अवलोकन केले असता वृक्ष नष्ट करण्याचा त्यांनीच प्रयत्न केला हे स्पष्ट होते करिता सदर खुलासा अमान्य करण्यात यावा व अर्जदाराला २०००० रु.(प्रती वृक्ष १०,००० रु.प्रमाणे ) दंड करण्यात यावा दंडाची रक्कम न भरल्यास नियमानुसार (मालमत्ता कारमध्ये समाविष्ट ) वसूल करण्यात यावा.<br>• सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर . | | |
| ९ | अड.शशिकिरण पलोड (आसोपा ) चंद्रावती नगर,साई नगर,बडनेरा | सिंगापुरी कपोक | १ | • **दि.०७/०३/२०२५** रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>• **तांत्रिक सदस्य यांचा अहवाल :-** सिंगापुरी कपोक वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार असून वृक्षाला फळे आलेली आहे वृक्ष मनपा ने टी गार्ड मध्ये लावलेला असून टी गार्ड अद्याप वृक्षाला लागून आहे कोणतीही अडचण नाही.विद्धुत तारेकडे झुकलेल्या फांद्या उद्यान विभागाने काढण्यात यावा त्याकरिता परवानगी देण्यास हरकत नाही.<br>• **अहवालानूसार वृक्षाच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे.** | **वृक्षाच्या विद्युत तारेकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | श्री प्रथमेश चिंचमलातपुरे भरत नगर,साई नगर,अमरावती | आंबा | १ | **दि.०७/०३/२०२५** रोजी फेर प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले<br>**तांत्रिक सदस्य यांचा अहवाल :-अर्जदाराने** विना परवानगी सदर वृक्ष तोडून नष्ट केल्याचे दिसून आले आंबा वृक्ष (राज्यवृक्ष) काढण्याची परवानगी मागणारा अर्ज सदर अर्जदारांनी दि.१८/१०/२०२४ रोजी केला होता त्या अनुषंगाने दि.११/१२/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली त्यावेळी अर्जदाराने बांधकाम करण्याची परवानगी सादर केलेली नव्हती फक्त वृक्ष काढण्याची परवानगी मागणारा साधा अर्ज केला होता त्यामुळे बांधकाम परवानगी व प्रपत्रात अर्ज नियमानुसार सादर केल्या नंतर वृक्ष तोडण्याच्या परवानगी बाबत विचार करता येईल असे अहवालात नमूद होते.त्याप्रमाणे अर्जदारानी दि.२४/०२/२०२५ रोजी ससनर विभागाची परवानगी सादर केली व प्रपत्र C व D सादर केले त्यानुसार पुन्हा पाहणी करण्यात आली तेव्हा आंबा वृक्ष नष्ट करण्यात आल्याचे दिसून आले.सबब सदर अर्जदाराविरुद्ध नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार दंडात्मक कार्यवाही सुचविण्यात येत आहे.आंबा वृक्ष राज्य वृक्ष अवैध पणे बेमुर्वतपणे तोडून नष्ट | **दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी.** | **सर्वप्रथम बांधकाम थांबविण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित करावी.दंड आकारण्याची कार्यवाही करावी.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केल्याबद्दल २०,०००/- रु.(वीस हजार रु.)दंड आकारण्यात यावा तसेच ३ बदली वृक्ष लावण्याकरिता ३x २००० =६०००/- रु.ठेव रक्कम असे एकूण २६,०००/- (सव्वीस हजार रु.) दंड करण्यात यावा ,दंड न भरल्यास नियमानुसार मालमत्ता करातून वसूल करण्यात यावा.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.** | | |
| ११ | श्रीमती मीना मधुकर मेश्राम<br>शिवाजी नगर,नवी वस्ती बडनेरा | कडूनिंब १<br>गोधन १ | २ | • **वृक्ष अधिकारी याचा अहवाल :-** सदर अर्जदारांना या कार्यालयाचे जा.अमनपा/द.प्र./सआ/६७३/२०२५ दि.३१/०१/२०२५ रोजीच्या पत्रा नुसार आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.अद्याप अर्जदारांनी कागतपत्रे सादर केलेले नाही.<br>• **सदर अहवाल आपल्या माहितीस सादर** | **माहिती घेऊन प्रकरण फेर सादर करावे.** | **प्रकरण माहिती घेऊन पुढील सभेत सादर करावे.** |
| १२ | विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ अमरावती | विविध प्रकारचे | १० | • **वृक्ष अधिकारी याचा अहवाल :-** सदर अर्जदारांना या कार्यालयाचे जा.अमनपा/द.प्र./सआ/७१३/२०२५<br>• दि.०४ /०२ /२०२५ रोजीच्या पत्रा नुसार आवश्यक प्रपत्र C व D विहित नमुण्यात व वृक्ष्याची यादी सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. अद्याप अर्जदारांनी कागतपत्रे सादर केलेले नाही<br>• **सदर अहवाल आपल्या माहितीस सादर** | **माहिती घेऊन प्रकरण फेर सादर करावे.** | **प्रकरण माहिती घेऊन पुढील सभेत सादर करावे.** |

## झोन क्र. ५

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्रीमती लता सुने महादा कोलनी रा.अमरावती** | जामुन, रामफळ, रिठे, गुलमोहर | ०४ | प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, गुल मोहर वक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेले व हिरवं गार आहे. गुल मोहर वृक्षाच्या विद्युत तारेवर अडकलेल्या २-4 इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात हरकत नाही. बांधकाम करतांना प्रत्यक्ष बांधकामात येणारी नैसर्गिक वाढलेली छोटी झुडपे काढण्याची परवानगी देण्यात | **प्रत्यक्ष बांधकामात येणारी नैसर्गिक वाढलेली छोटी झुडपे काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी.** | **वृक्षाच्या विद्युत तारेवर अडकलेल्या २-4 इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हरकत नसावी. | | |
| २ | **श्रीमती शांताबाई किसनराव खडसे. रा. माताखिडकी, अमरावती** | वड वृक्ष | ०१ | प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, पिपंळ वृक्ष नझुल जागेवर छान वाढलेले व हिरवगार आहे सदर अर्जदार श्रीमती खडसे यांना रमाई योजनेतुन घरकुल मंजुर असुन घरकुल बांधकामात वृक्षाची अडचण असल्याचे दिसुन येथे सबब सार्वजनिक जागेवरील वृक्ष असल्याने उद्यान विभागाने वृक्ष काढण्याची कारवाई करावी व नियमानुसार बदली वृक्ष लावण्याकरीता उचित नियोजन करावे. वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. | **वृक्ष काढण्यास हरकत नाही** | **वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने उद्यान विभाग मार्फत वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | **श्री दिग्विजय सुरेंद्र देशमुख रा. आचल विहार अमरावती** | कडू निंब | ०१ | प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता १ कडुलिंबांचे वृक्ष रस्याचे कडेने छान वाढलेली व हिरवागार आहे. कोणतेही अडचन दिसुन येत नाही सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. व सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात यावी व वृक्षाला इजा पोचवु नये असे आदेशित करण्यात येत आहे | **वृक्ष रस्याचे कडेने छान वाढलेली व हिरवागार आहे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |

# वेळेवरील विषय

## झोन क्र.२

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री. प्रमोद तु. सोनकुसरे बालाजी नगर अम तक्रारकर्ता** | **उंबर, पिंपळ आवळा, कडुनिंब व इतर वृक्ष अवैध वृक्षतोड** | ७ | श्री. प्रमोद तु. सोनकुसरे बालाजी नगर अमरावती यांच्या तक्रारनुसार १) दिपक ठाकरे, अध्यक्ष २) शितलसिंह चव्हाण, सचिव बालाजी नगर विकास समीती शंकर नगर जवळ अमरावती उद्याना मधिल यांनी बिनापरवानगी वृक्ष तोडल्याबाबत दि. ०७/०६/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा ठराव के. १८ नुसार गैरअर्जदार यांना दिलेल्या नोटिस प्रमाणे दंड कायम ठेवण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे. दि. ०७/०२/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा ठराव के. २१ नुसार आपणास दिलेल्या नोटिसनुसार तसेच समीती बदली वृक्ष लागवड करेल असे गृहीत धरुन त्याकरीता ठेवावी लागणारी ठेव या पासुन सुट देण्यात येत आहे. नियमानुसार ५ वृक्षास ३०००/- रु. ५०३०००-१५०००/- रु. दंड व २ वृक्षास प्रती वृक्ष ५०००/- रु. | **सद्य स्थितीत झाडे हिरवीगार असल्याने तसेच संस्था सेवा भावी असल्याने दंड माफ करण्यास हरकत नाही.** | **दंड माफ करण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०५०००=१००००/- रु एकुण दंड रक्कम<br>२५०००/- रु. भरण्यात यावी. वृक्ष<br>प्राधिकरण धोरणानुसार १४३ अये १<br>वृक्षाच्या बदली ३ वृक्ष ७४३ २१ वृक्ष<br>लागवण्यात यावी. व तसा अहवाल सादर<br>करण्यास नोटिस देण्यात आली. जा.क्र. १८६<br>दि. १९/०६/२०२४ रोजी दंड रक्कम<br>२५०००/-रु. उद्यान विभाग येथे<br>भरण्याकरीता नोटिस देण्यात आली.<br>त्यानंतर स्मरणपत्र १,२,३ देण्यात आले<br>असुन विहीत कालावधीमध्ये आज पर्यंत दंड<br>रक्कमेचा भरणा करण्यात आलेला नाही.<br>याप्रमाणे गैरअर्जदार यांच्या मालमत्तेत दंड<br>रक्कम समाविष्ट करावी लागेल. तसेच पुढिल<br>कार्यवाही करीता<br>दि. २७/०९/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण<br>सभा ठराव क्रं. ८ नुसार नियमानुसार दंड<br>आकारण्याची कारवाई करण्यात यावी. व<br>दंड न भरल्यास सदर दंड मालमत्ता करात<br>समाविष्ट असा निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>या प्रमाणे मालमत्ता करात दंड रक्कम<br>समाविष्ट करण्याकरीता कर विभाग व<br>गैरअर्जदार यांना पत्राद्वारे कळविले आहे.<br>त्यानुसार श्री. दिपक ठाकरे व शितल चव्हाण<br>यांच्या मालमत्ता करात दंड रक्कम समाविष्ट<br>करण्यात येईल. या बाबत जा. क्र. ७८४ दि.<br>३०/१२/२०२४ रोजी पत्राद्वारेकळविले<br>आहेत. त्यानुसार त्यांनी दि. ११/०३/२०२५<br>रोजी अर्ज सादर करुन बालाजी नगर च्या<br>विकासासाठी स्वतःहुन सामाजिक कार्यकरीत<br>असतांना त्यांना वैयतिकरित्या दंड आकारणे<br>ही एक प्रकारे सामाजिक कार्य करण्याची<br>शिक्षा झाली आहे. वास्तविक बालाजी नगर<br>मधिल महानगरपालिकेचे कोणतेही उद्यान<br>नसुन जी झाडे तोडण्याचा आरोप करण्यात<br>आला. होता ती झाडे तोडण्यात आली नाही.<br>केवळ झाडाच्या कमजोर झालेल्या फांदया<br>छाटण्यात आल्या. आम्ही यापूर्वी मा. आयुक्त<br>यांना भेटलो असता त्यांनी दंड माफ<br>करण्याचे मान्य केले होते. परंतु त्यांचे<br>स्थानांतरण झाल्यामुळे सदर दंड माफ<br>करण्याविषयी आपणास विनंती करीत<br>आहोत. आमचे बहुतेक सर्व सदस्य सेवानिवृत्त<br>असुन ते आपला वेळ परीसराच्या कामारीता<br>देतात. जी आडे तोडल्याचा आरोप करण्यात<br>आला आहे. ती सर्व झाडे आता बहरलेली<br>असुन त्यांचे Jio Tag फोटो सोबत जोडले<br>आहेत. आमच्या नगरा बाहेरील व्यक्तीने<br>जाणिवपुर्वक केलेल्या तक्रारीच्या आधारे<br>महापालिकेकडुन दंड आकारण्यात येत असेल<br>यापुढे परीसरातील नागरीक कोणत्याही<br>सामाजिक कार्यात सहभागी होणार नाहीत | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | त्यामुळे महापालिकेने या संदर्भात केलेली कार्यवाही रद्द करण्यात यावी. तसेच आकारण्यात आलेला दंड रद्द करण्यात यावा. किंवा अत्यंत नाममात्र दंड आकारण्यात . यावा. असा विनंती अर्ज करण्यात आलेला आहे. उचित निर्णयास सादर. | | |
| २ | श्री. प्रदीप पाटील यांची प्राप्त तक्रार | कडूनिंब<br>पेल्ट्रा फ्रॉम | ०१<br>०१ | मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार झोन क्र.२ मधील स्थळ निरीक्षण करण्यात आले आहे.त्यानुसार कडूनिंब १ वृक्ष व पेल्ट्रा फ्रॉम १ वृक्ष अवैध वृक्ष तोड करण्यात आली असल्याचे निदर्शनारा आले असून मा.वृक्ष प्राधिकरण यांच्या उचित निर्नायास्तव सादर | **अवैधपणे वृक्षतोड केली असल्याने प्रति वृक्ष २०,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात यावा.** | **वृक्ष अधिकारी यांनी प्रति वृक्ष २०,०००/- प्रमाणे दोन वृक्षांचा दंड वसूल करावा व सदर कंत्राटदार यांना ताकीद द्यावी यानंतर असे होणार नाही असे सूचित करावे.** |

## उद्यान विभाग वेळेवरील विषय

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | विषय | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | विलास रघुपतराव देशमुख | अमरावती मनपा वृक्ष प्राधिकरण समिती मध्ये तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत | अमरावती महानगरपालिका हद्दीमधील येणाऱ्या अर्जाची संख्या लक्ष्यात घेता व सादर करण्यात आलेल्या अर्जदारचे शैक्षणिक पात्रता पाहता तांत्रिक सल्लगार म्हणून नियुक्ती देण्यास हरकत नाही. | **विलास रघुपतराव देशमुख यांची तांत्रिक सल्लगार म्हणून वृक्ष प्राधिकरण समिती मध्ये नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.** |

**आयुक्त**
**महानगरपालिका अमरावती**